



# स्वच्छ सुंदर हरित ग्राम खैरी/वलमाझरी

## पंचायत समिती - साकोली

## जिल्हा परिषद - भंडारा

महाराष्ट्र राज्यातील भंडारा जिल्हात साकोली तालुक्यातील निसर्गच्या सानिध्यात नागझिरा वन्यजिव अभयारण्य पायथ्याशी २४४२ लोकसंख्या असणारी खैरी, वलमाझरी, आमगाव/खुर्द, पिटेझरी चार गावांची एकमेव अतिशय सुंदर, रमणीक अशी ग्रा.पं.कार्यालय वलमाझरी ह्या ठिकाणी आहे, कार्यालयातील सरपंच, ग्रामसेवक, ग्रामसंसद तसेच दप्तर/रेकोर्ड कक्ष अतिशय नियोजन बद्ध पद्धतीने बनविले असुन गावाच्या प्रवेशद्वारावर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि संत गाडगेबाबा यांचे अतिशय सुंदर स्मारके तसेच आपण गावात जसे प्रवेश करतो तसे तसे विविध थोर पुरुषांचे महान व्यक्तीमत्त्व असणाऱ्या व्यक्तीच्या प्रतिमा, गावात प्रवेश करताच येणाऱ्या नागरिकांना हातधुण्यासाठी व जनावरांना पिण्याच्या पाण्याची सोय केलीली आहे,

१२ फेब्रुवारी २०२१ ला पुरुषोत्तम रुखमोडे यांची सरपंच पदावर बिनविरोध निवड करण्यात आली, त्यांनी गावातील गलीछच्ता, रस्ते रोजगाराच्या समस्या, पाणी आरोग्य ह्याकडे लक्ष देयून निवारण केले तसेच गावातील महिला, युवक, ग्रामवासी यांच्या सभा घेवून गावात सर्वांगीण विकासाच्या दृष्टीकोनातून काय करता येईल यावर लक्ष केंद्रित करून गाव विकासास गती निर्माण केली, त्यांनी लोकवर्गणी तसेच गावातीलच सार्वजनिक हनुमान मंदिराचे पैसे व शासकिय निधी यांचा मेळ घालून विशेष भर देण्यात आले, गाव स्वच्छ सुंदर हरित कसे होईल या दृष्टीने गावामध्ये प्रत्येक कुटुंबाना ओला,सुखा,घातक कचरा ठेवण्यासाठी कचरा कुंड्या वाटप करण्यात आल्या, गावात प्रत्येक मौक्याच्या ठिकाणी सार्वजनिक कचरा कुंड्या लावण्यात आल्या, आणि कचरा जमा करण्यासाठी स्वच्छता

मजुर नेमुन एक कचरा गाडी ई- रिक्षा खरेदी करण्यात आली, ई रिक्षाने मजूर गावातील कचरा गोळा करून ग्रामपंचायतीच्या कचरा विलगीकरण केंद्रात गोळा करतो, कचरा गोळा झाल्यांनतर त्याचे वर्गीकरण बचत गटाच्या महिला करतात,सुखा व घातक कचऱ्या पैकी काही वस्तूंची विक्री केली जाते, काही रिसायक्लीन साठी वापर केला जातो,ओला कचऱ्याचा खत तयार केला जातो, महिलांचे सॅनिटरी पॅड वाटपाची तसेच जाळण्याची ग्रा.पं. नी सोय केलेली आहे, गावात ठिकठिकाणी हॅण्डवॉश बेसिन लावण्यात आल्या आहेत,प्रत्येक कुटुंब शौचालायचा वापर करतात, चारही गावात सार्वजनिक शौचालय तयार करणायत आले, गावात बोलक्या शाळा व अंगणवाडी तयार करण्यात आल्या, प्रत्येक अंगणवाडी व शाळेत मुलांना व कर्मचारी स्वतंत्र शौचालय तयार करण्यात आले, प्रत्येक शौचालयाला हात धुण्यासाठी बेशीन लावण्यात आलेल्या आहेत, बेसिन चा पाणी ज्या ठिकाणी जातो तीथ शोष खड्डा तयार करण्यात आला, शाळेत परसबाग सुद्धा तयार आहे,  शाळेत नियमित पोषण आहार दिला जातो व विशेष करून विद्यार्थ्यांच्या स्वच्छतेकडे लक्ष दिले जाते, शाळेत इतरही खूप साऱ्या सुविधा निर्माण केल्या आहेत, गावातील बहुतांश वाहणाऱ्या नाल्यांना बंदिस्त करण्यात आले, व त्या ठिकाणी शोष झाडे लावण्यात आले,गावातील प्रत्येक पाण्याच्या स्त्रोतांच्या ठिकाणी तसेच प्रत्येक घरी  शोष खड्डे तयार करण्यात आले, काही नालीला शोष नाली तर काही नाली वरती स्थिरीकरण तळे तयार करून शुद्ध पाणी शेती व परसबागेला देण्यात येऊ लागले, व उत्तम परसबाग तयार करण्यात आली,

गावाच्या रस्त्याच्या दुतर्फा वृक्ष लागवड केली असुन वृक्षांना ड्रीप द्वारे पाणी देण्याची पद्धती अवलंबविली आहे, गावात मुल जन्माला आल्यास ,नवदाम्पत्य कडून एक वृक्ष लागवड करून त्याची जोपासना करण्याची जबाबदारी त्यांचेकडेच देण्यात येते, ग्रामपंचायतीची स्वत:ची ५० प्रकारची फळझाड असणारी नर्सरी सुद्धा तयार करण्यात आली,  गावात वर्षात सर्वात जास्त वृक्ष लागवड करणाऱ्या व्यक्तीस प्रत्येक २६ जानेवारी ला  “ वृक्ष सखा “ पुरस्कार देऊन गौरवीत करतो,  संपूर्ण गाव तसेच परिसर हिरवेगार झाले आहेत, गावातील पथदिवे आहेत, गावातून नागझिरा अभयारण्यचा प्रवेशद्वार आहे, हे LED चे आहेत तसेच २५ दिवे हे सौर वर आहेत, ७ हायमास्त लाईट सौर वर, पाणीपुरवठा, शाळा, अंगणवाडी, ग्रामपंचायत सौर वर करण्यात आली आहे,

गावात १० वनराई बंधारे लोकसहभागातून, काही सिमेंट बंधारे, नालासरळीकरण, तलाव खोलीकरण करण्यात आले आहे, गावच्या तलावात पाणी हा सतत राहतो , सर्व शासकीय इमारतींना तसेच काही कुटुंबाच्या घरी रेन वाटर हार्वेस्टिंग केली आहे,

गावात पाणीपुरवठा असुन प्रत्येक घरी नळ देण्यात आला आहे, आणि प्रत्येक नळाला वाटर मीटर लावला आहे, त्यामुळे पाण्याचा अपव्यय टळतो,

गावातील बचत गट, महिला, युवक, प्रत्येक आठवड्याचा एक दिवस रविवार १ तास गाव झाडण्यासाठी देतात, गावात प्लास्टिक बंदी करण्यात आली आहे, ग्रा.पं. गावकर्यांना कापडी पिशव्या वाटप करतो,

ग्रामपंचायत विविध उपक्रम राबवत असतो , जसे आरोग्य शिबीर, स्नेहसंमेलन ई अनेक प्रकारचे ग्रामपंचायत दरवर्षी गावाचे नाव लौकिक करणार्यांना “ग्राम रत्न पुरस्कार “ , उत्कृष्ट शेतकर्यांना “ आदर्श शेतकरी”, उत्कृष्ट खेळाडूस “ ग्रामक्रिडा पुरस्कार “, वृक्ष सखा पुरस्कार , १० व १२ मध्ये ८०% गुण पेक्षा जास्त गुण घेणाऱ्या विद्यार्थ्यास गौरव पुरस्कारने सन्मानित करण्यात येते,

गावातील लोकांनी वेळोवेळी लसीकरण, आरोग्याची सर्वच प्रकारची काळजी घेण्यात येत, वेळोवेळी मार्गदर्शन शिबीर लावण्यात येतात, ग्रा.पं. चे सर्व कर , सन २०२०-२०२१ पासुन आज पर्यंत संपूर्ण पणे कर भरतात, १००% टक्के करवसुली ही सतत होत आहे, त्यासाठी ग्रामपंचायत त्यांना मोफत शुद्ध पाणी तसेच कर भरनार्यांचा ड्रा काढून ध्वजारोहणाचा मान तसेच अनेक बक्षीस देतो,

# धन्यवाद !!!